संदर्भ - 1) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहितीचा अधिकार/61-200, दि.3/1/2003
2) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहितीचा अधिकार/901, दि. 5/3/2004
3) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/ममाअ/3718/2005, दि. 16/9/2005
4) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहिती अधिकारी/08/3652, दि. 1/9/2008
5) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहिती अधिकारी/08/772, दि. 4/3/2009
6) या कार्यालयाचे आदेश क्र.का 9/आस्था 2/माहिती अधिकारी नियुक्ती/2877,दि. 9/10/2009
7) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांचे पत्र जा.क्र.अमुनि/आस्थापना/6071/14 दिनांक13/11/2014.

---

क्र.का9/आस्था-2/के.मा.अ./3510/14
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक :-11/12/2014

**विषयः-** केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम -2005 अन्वये शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत.

**आदेश**

ज्या अर्थी, संदर्भात नमुद 1 ते 6 आदेशान्वये केंद्रीय माहीती अधिकार सन 2005 मधील कलम 5(1) मधील तरतुदिनुसार नोंदणी व मुद्रांक विभागातर्गत असलेल्या कार्यालयातील अधिकारी यांना माहिती अधिकार नियम 2005 अन्वये कर्तव्य व जबाबदा-या पार पाडण्यासाठी शासकीय माहिती अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे,

आणि ज्या अर्थी, नोंदणी व मुद्रांक विभागामधील काही कार्यालयांचे कार्यक्षेत्रामध्ये बदल झाला आहे व काही कार्यालयाचे पत्यामध्ये बदल झाला आहे व काही कार्यालये नव्याने निर्माण झाली असुन सदर कार्यालयासाठी शासकीय माहिती अधिकारी घोषीत करणे आवश्यक आहे,

आणि ज्या अर्थी, सह जिल्हा निबंधक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून यापुर्वीच घोषीत करण्यात आले आहे, तथापि, जनतेच्या सोई व हित हि बाब विचारात घेवुन त्यामध्ये बदल करण्याची अवश्यकता विभाग प्रमुख या नात्याने निम्नस्वाक्षरीकार यांचे मत झाले आहे,

त्याअर्थी वरील सर्व घटनांचा/बाबींचा एकत्रीत विचार करुन सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन खालील तत्क्यात नमुद केल्याप्रमाणे विभागातील प्रत्येक कार्यालयासाठी, माहिती अधिकार नियम 2005 अन्वये कर्तव्य व जबाबदा-या पार पाडण्यासाठी शासकीय माहीती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी घोषीत करण्यात आलेले आहेत.

तथापि, अपर मुद्रांक नियंत्रक यांनी संदर्भ क्र.7 प्रमाणे प्रस्तावित केल्याप्रमाणे सादर केलेल्या पुर्वीच्या आदेशाची अनुक्रमांक 1 ते 21 प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यालय | जन माहिती अधिकारी | अपीलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | दुय्यम निबंधक | संबंधित दुय्यम निबंधक | संबंधित जिल्हयाचे सह जिल्हा निबंधक |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | विवाह अधिकारी | संबंधित विवाह अधिकारी | संबंधित जिल्हयाचे सह जिल्हा निबंधक |
| 3 | सह जिल्हा निबंधक | संबंधित सह जिल्हा निबंधक कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-2 | संबंधित जिल्हयाचे सह जिल्हा निबंधक |
| 4 | नोंदणी उपमहानिरीक्षक | संबंधित कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-2 | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक |
| 5 | नोंदणी महानिरीक्षक | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.9 | नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय) |
| 6 | शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे | प्रशासकीय अधिकारी वर्ग-2 | व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे |
| 7 | मुंबई विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी | संबंधित कार्यालयातील दुय्यम निबंधक, श्रेणी-1 | संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी |
| 8 | उपसंचालक/ सहाय्यक संचालक, नगररचना मूल्यांकन | संबंधित उपसंचालक /सहाय्यक संचालक, नगररचना, मूल्यांकन | सह संचालक, नगररचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य,पुणे |
| 9 | सह संचालक, नगररचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य,पुणे | नगररचनाकार | सह संचालक, नगररचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| 10. | अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई (कोषागार शाखा) | अपर कोषागार अधिकारी | कोषागार अधिकारी |
| 11. | अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई (लेखा शाखा) | लेखाधिकारी | अपर मुद्रांक नियंत्रक |
| 12. | अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई (आस्थापना शाखा) | मुद्रांक उपअधिक्षक(आस्थापना) | अपर मुद्रांक नियंत्रक |
| 13. | अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई (फ्रँकिंग शाखा) | मुद्रांक उपअधिक्षक(फ्रँकिंग शाखा) | अपर मुद्रांक नियंत्रक |
| 14. | अपर मुद्रांक नियंत्रक , मुंबई (परतावा शाखा) | मुद्रांक उपअधिक्षक(परतावा शाखा) | अपर मुद्रांक नियंत्रक |
| 15. | अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई ( अपील शाखा) | नगर रचनाकार | अपर मुद्रांक नियंत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| 16. | मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र.1 | मुद्रांक निरीक्षक | मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र.1 , मुंबई |
| 17. | मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र.2 | मुद्रांक निरीक्षक | मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र.2 , मुंबई |
| 18. | मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई | पर्यवेक्षक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई | मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई |
| 19. | मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी | पर्यवेक्षक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अंधेरी | मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी |
| 20. | मुद्रांक जिल्हाधिकारी, कुर्ला | पर्यवेक्षक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, कुर्ला | मुद्रांक जिल्हाधिकारी, कुर्ला |
| 21. | मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली | पर्यवेक्षक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, बोरीवली | मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली |

वरीलप्रमणे नियुक्त प्रधिका-याने केलेल्या नियुक्ती प्रमाणे आपल्ये कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्यात.

**सही/- श्रीकर परदेशी**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रति,**

1) सर्व संबंधीत शासकीय माहिती अधिकारी / अपीलीय अधिकारी
2) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
3) सर्व सह जिल्हा निबंधक
4) अप्पर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
5) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

**प्रत,**

6) उप सचिव, महसुल व वन विभाग (म-1) मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी.
7) सर्व विभागीय आयुक्त यांना माहितीसाठी.
8) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हानिबंधक यांना माहितीसाठी.

**निर्गमित**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता**